महावितरण

# जाहीर निवेदन

अधिक्षक अभियंता, महावितरण, मंडळ कार्यालय, यवतमाळ यांच्या आस्थापनेवर सन 2025-2026 करिता NCVT अंतर्गत वीजतंत्री / तारतंत्री व कोपा **(Designated Trade)** या स्वतंत्र व्यवसायासाठी आय. टी. आय. उत्तीर्ण उमेदवाराकडून एक वर्ष कालावधी करिता शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणार्थी वीजतंत्री 110 व तारतंत्री 109 अशी एकूण 219 पदे तसेच कोपा (Computer Operator & Programming Assistant) यांची एकुण 30 पदे भरण्यासाठी पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक उमेदवारांनी **दि. 02.06.2025 पासुन 10.06.2025 पर्यंत** या कालावधी मध्ये **www.apprenticeshipindia.org.in** या संकेतस्थळावर आस्थापना कोड **E09162700368** वर ऑनलाईन अर्ज सादर करावेत. **दि. 10.06.2025** नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराची निवड हि आय. टी. आय. एकूण गुणाच्या टक्केवारी (मेरीट) नुसार खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येईल.

1) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री/ तारतंत्री व कोपा स्वतंत्र व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. 2) ऑनलाईन अर्ज सादर करतांना - SSC गुणपत्रिका व प्रमाणपत्र, आय. टी. आय. गुणपत्रिका (चार सेमिस्टर / वार्षिक ) ( व आयटीआय उत्तीर्ण जात प्रमाणपत्र (मागास प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना आवश्यक), रहिवाशी प्रमाणपत्र, उमेदवाराची सही, फोटो, जन्म तारिख, जातप्रवर्ग हि माहिती अचूक भरण्यात यावी. तसेच इतर आवश्यक मूळ प्रमाणपत्र योग्य रीतीने सुस्पष्ट दिसतील असे स्कॅन करून उमेदवारांनी स्वतःच्या प्रोफाईलवर अपलोड करावे, सोबत रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड सादर करणे आवश्यक आहे. अपुरे अर्ज किंवा अस्पष्ट कागदपत्रे ऑनलाईन अपलोड केल्यास अश्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही व या बाबत कसल्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. 3) वयोमर्यादा 18 ते 27 वर्ष, मागासवर्गीयांसाठी 5 वर्ष शिथिलक्षम. **4) सदर भरती करिता यवतमाळ जिल्ह्यातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.** 5) शिकाऊ उमेदवार यांनी पोर्टलवर रजिस्ट्रेशन करणे व ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. 6) विद्यावेतन नियमा प्रमाणे. 7) या कार्यालयामार्फत निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना त्यांनी ऑनलाईन अर्जात सादर केलेल्या ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांकावर पुढील कार्यवाही बाबत कळविण्यात येईल. सध्यस्थितीत चालू असलेले ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक ऑनलाईन अर्जात सादर करणे हि सर्वस्वी उमेदवारांची जबाबदारी राहील. 8) निवड करण्यात आलेल्या उमेदवारांना यवतमाळ मंडळ अंतर्गत **यवतमाळ, दारव्हा, पुसद व पांढरकवडा** या विभागामध्ये वाटप करण्यात येईल. मूळ कागदपत्रे तपासणी वेळी काही तफावत अथवा माहिती चुकीची आढळल्यास उमेदवारांची निवड कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. वरील नुसार सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती (ऑनलाईन अर्जाच्या प्रतिसह) व सोबत मूळ कागदपत्रे पडताळणी करीता **दि. 21.06.2025 ते 23.06.2025 रोजी सकाळी 10:00 ते 18:00** या वेळेत उमेदवार यांनी स्वतः ''लघु प्रशिक्षण केंद्र, मंडळ कार्यालय, विद्युत भवन, यवतमाळ येथे उपस्थित राहणे आवश्यक, सदर कालावधीत कागदपत्रे पडताळणी करीता उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही तसेच इतर मार्गाने सादर केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**टिप** - भरती प्रक्रियेमध्ये आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे, नमूद पदे कमी-जास्त करण्याचे तसेच भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापन राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

**अधिक्षक अभियंता, महावितरण,**
**मंडळ कार्यालय, यवतमाळ.**

**पी. आर. ओ. नं. 68**